क्र.का.१२/मुद्रांक परतावा/१७८२–१८२०
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे १
दिनांक :– ११.९.१९९५

**विषय :– मुद्रांकाचा परतावा मंजूर करण्याच्या प्रकरणी मुद्रांकांच्या खरेपणाबाबत छाननी करणे.**

**परिपत्रक :–**

उपरोक्त विषयाबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का. १२/मू/परतावा/१९१०-६२ दिनांक १३/५/९३ अनुसार मुद्रांकाच्या परताव्याच्या प्रकरणी मुद्राकांची छाननी करून त्यांच्या खरेपणाबाबतचे प्रमाणपत्र मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी देणे आवश्यक असल्याचे कळविण्यात आलेले आहे.

याबाबत शासनाच्या वित्त विभागाने सुचविल्यानुसार आपणास कळविणेत येते की, उपरोक्त मुद्रांकाबाबतचे प्रमाणपत्र देताना त्यावर संबंधित अधिकाऱ्याचे नाव, रबरी शिक्का वापरणे व मुद्रा उमटविणे, तारीख नमूद करणे आवश्यक आहे. तरी परताव्याचे प्रस्ताव पाठविताना वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करून प्रमाणपत्र पाठविण्यात यावे.

का.प्र.मा.नोंद.म.नि.
यांचे मान्यतेने –

सही/
(सू.शा.माळी)
उपनोंदणी महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :–
१) अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
३) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व सह जिल्हा निबंधक
४) मुद्रांक अधिक्षक, मुंबई